नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०३/०५/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## जबर दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०.५ कि.मी. अंतरावरील सत्रापुर येथे दिनांक ०६/०४/२०२२ चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– भेडन सचिन पुरवले वय ४० वर्ष रा.सत्रापुर कन्हान व आरोपी क्र. १. युवराज भिमराव गायकवाड रा. सत्रापुर हे एकमेकांना चांगल्याप्रकारे ओळखत असुन एकमेकांचे नातेवाईक आहेत. आरोपी क्र. १ युवराज भिमराव गायकवाड, २. जयराम भिमराव गायकवाड यांनी संगणमत करून मोटरसायकलची चाबी न दिल्याच्या कारणावरून फिर्यादी चे घराबाहेर येवुन फिर्यादीच्या मुलास शिवीगाळ करीत होते. फिर्यादीने आरोपीला हटकले असता आरोपीतांनी फिर्यादीला लोखंडी पाईपने डाव्या, हातावर मारले मारले. तसेच आरोपीतांनी लोखंडी पट्टीने फिर्यादीचा डाव्या पायाला, मांडीवर मारून जखमी करून शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. फिर्यादी हे दि. १०/०४/२०२२ रोजी मेयो हॉस्पीटल नागपूर येथे उपचाराकरीता भरती झाले असता त्यांचा डावा हात फॅक्चर असल्याचे दिसुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण सहारे मो.न. ९३०९५२९५१२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

१) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील टेकाडी शिवार एन एच. रोड नागपुर ते जबलपुर रोडवर येथे दिनांक ०२/०५/२०२२ चे १३.२० वा. सुमारास फिर्यादी नामे– श्रीमती मिना शैलेश चौधरी वय २४ वर्ष रा. समता नगर जरीपटका, नागपूर ही व तिचा पती व मुलासह एम.एच– ३४/पी– ८३४३ क्रमांकाचा मोटरसायकलवर डबल सीट मागे बसुन फिर्यादीचा पती चालवित नागपुर वरून कन्हान मार्ग बाहेर गावाला जातांना टेकाडी शिवार टेकाडी पुलीया जवळ एनएच ४४ रोडवर एमएच–४०/वाय– ९४९८ क्रमांकाचा ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित आनुण मागुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात फिर्यादी व तिचा पती, मुलगा हे खाली पडले फिर्यादीचे पती व मुलाचे शरीरावरून ट्रकचे मागील चाक गेल्याने ते जागीच मरण पावले. तर फिर्यादी या गंभीररित्या जखमी झाल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. विलास काळे मो.क्र. ९८६७११२१८५ हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा उदासा गावाजवळ, उमरेड नागपूर हायवे रोड येथे दिनांक २२/०४/२०२२ चे १९.०० वा. ते दिनांक २३/०४/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास **योगेश ज्ञानेश्वर ईखारकर(मृतक), वय ३२ वर्ष, रा. नागपूर** हा दारूच्या नशेत असतांना मौजा उदासा गावाजवळ उमरेड नागपुर रोडवर हायवेवर असतांना अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन धडक दिली. या अपघातात योगेश्वर ईखारकर यांच्या मरणास आरोपी कारणीभुत ठरला. तसेच जखमीला कोणतीच मदत न करता घटनास्थळावरून पळुन गेला. अशा फिर्यादीच्या लेखी मर्ग पोस्टे उमरेड मर्ग क्र. २०/२२ वरून चौकशी अहवाल वरून सदर गुन्हा अज्ञात वाहन चालकावर नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १३४(अ), १३४(ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. राजु डोर्लीकर मो.क्र. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा रानवाडी येथे **रविंद्र नंदलाल खजुरीया (मृतक), वय ५२ वर्ष रा. रानवाडी** याच्यावर शेती बाबत कर्ज असल्याने त्यामुळे टेंशन मध्ये राहत होता. तसेच त्याचा लता मंगेश्वर नागपुर येथील उपचार चालु असता दि. ०१/०५/२२ ते ०२/०५/२२ चे रात्री दरम्यान घराचे आत झोपला असता सकाळी ०५.०० वा पत्नीला दिसला नसल्याने त्याचा शोध घेतला असता घराचे बाजुला जुने घरी प्रेसचे वायरने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जनार्धन नंदलाल खजुरीया वय ४७ वर्ष रा. रानवाडी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रजोक तायडे मो.नं. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील झिल्पा येथे दिनांक ०१/०५/२०२२ चे १०:०० वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा नामे– **दिनेश घनश्याम राखडे(मृतक), वय २६ वर्ष रा.झिल्पा ता. काटोल** हा दारू पिण्याचे सवयीचे असुन तो गच्चीवर झोपण्यास गेला असता गच्चीवर टाकलेले पलंगवरून खाली पडुन मरण पावला.
सदर प्रकरणी फिर्यादी नामे– घनश्याम सखाराम राखडे वय ६६ वर्ष रा.झिल्पा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोना अविनाश बाहेकर मो नं. ८३०८४०५३७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**